**Khandesh College Education Society's**
**Institute of Management & Research, Jalgaon**
**Affiliated to KBC North Maharashtra University, Jalgaon**
**NAAC Accredited**

## Activity Report

| | |
|---|---|
| **Name of the Activity** | International Business Research E-conference on “Sustainable ideas for business development in the New Normal” |
| **Date** | 25/03/2023 |
| **Organizing Department** | Institute |
| **Number of Participants** | 65 (hybrid mode) |

### Description

The 3rd International Conference on 'Innovation, Automation, and Future Trends in Business' (IMR-INCON-03) was recently held, attracting industry professionals, researchers, and academicians from around the world. The conference served as a platform to discuss and explore cutting-edge advancements in innovation, automation, and emerging trends that shape the business landscape. Conference is coordinated by Dr. Parag Narkhede. There are 33 papers presented in the conference by over 50 researchers, academicians and industry fellows across the globe.

The keynote was given by Mr. Umakant Narkhede, Head of Midsized Insurance, INFOSYS, USA, followed by Chief Guest Mr. Vaibhav Nehete, Entrepreneur (Kiran Pipe, Jalgaon) and Mr. Sagar Patil, Manager, KCIIL, KBCNMU, Jalgaon the Conference was inaugurated by Prof. S. T. Ingle, Hon’ble Pro VC, KBCNMU, Jalgaon and Chaired by Dr. Harshwardhan Jawale, Executive Committee Member KCE Society.

## तज्ज्ञांचा सूर; केसीई ‘आयएमआर’मध्ये आंतरराष्ट्रीय परिषद

# उद्योग, व्यवसायात नवीन विचारांना चालना हवी

▸ सकाळ वृत्तसेवा

जळगाव, ता. २६ : व्यवसाय, उद्योग क्षेत्रात यश मिळवायचे असेल, तर तरुणांनी विचारांना चालना, स्वयंशिस्त व भविष्यातील बदलांचा वेध घेऊन प्रवास करावा, असे आवाहन तज्ज्ञांनी केले.

केसीई आयएमआरमध्ये ‘व्यवसायातील नवकल्पना, स्वयंचलन आणि भविष्याचा मागोवा’ या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेत विविध विषयांतील तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

या परिषदेचे उद्घाटन उमविचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. एस. टी. इंगळे यांच्या हस्ते झाले. उमाकांत नारखेडे, इंन्फोसिसचे (युएस) यांचे बीजभाषण झाले. प्रसिद्ध उद्योजक वैभव नेहेते आणि ‘उमवि’च्या केसीआयआयएलचे व्यवस्थापक सागर पाटील प्रमुख पाहुणे होते. डॉ. श्वेता चोरडिया यांनी सूत्रसंचालन केले.



जळगाव : केसीई आयएमआरमध्ये ‘व्यवसायातील नवकल्पना, स्वयंचलन आणि भविष्याचा मागोवा’ या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन करताना प्रा. एस. टी. इंगळे, प्रा. शिल्पा बेंडाळे, उमाकांत नारखेडे, वैभव नेहेते आदी.

सुरवातीला परिषदेचे निमंत्रक डॉ. पराग नारखेडे यांनी या परिषदेची संकल्पना उपस्थित संशोधक विद्यार्थी आणि प्राध्यापकांसमोर विषद केली. त्यानंतर संचालक प्रा. डॉ. शिल्पा बेंडाळे यांनी ही कॉन्फरन्स हायब्रिड मोड असल्याने भारतातून आणि परदेशातूनही अनेक संशोधक यात सहभागी असल्याचे सांगत संवाद साधला.

उद्घाटनपर भाषणात प्रा. इंगळे यांनी अध्यक्षीय भाषणात, व्यवसायातील इनोव्हेशन, ऑटोमेशन आणि त्याच्याशी संबंधित भविष्यातील महत्त्वाचे घटकांवरील संशोधनावर या परिषदेतून विचारविनिमय होणार आहे. भारतात संशोधन आणि त्यायोगे होणाऱ्या विकासाला खूप स्कोप आहे. ऑटोमेशनवरही भारत फोकस करीत आहेत. स्टीम लाईममध्ये भविष्यातील शक्यतांचा विचार करत असताना डिजिटालाइजेशन आणि क्लाऊड बिझनेस यात भारतीय फार महत्त्वाची भूमिका घेत आहे. इथे अनुभवी लोक हवे आहेत. त्यामुळे विद्यार्थांनी अशा विषयांवरील संशोधनाला प्रधान्य दिले पाहिजे.

केसीईचे व्यवस्थापन सदस्य डॉ. हर्षवर्धन जावळे म्हणाले, की एक डॉक्टर म्हणून या क्षेत्रातही अनेक इनोव्हेशन होत आहेत. या बदलांमुळे आता कित्येक मोठ्या सर्जरीनंतरही रुग्ण त्याच दिवशी घरी जाऊ शकतो.

त्यानंतर उमाकांत नारखेडे यांनी मनोगतात आर्टिफिशियल इंटिलिजन्स हा भविष्यातील फार महत्त्वाचा रिसोर्स असल्याचे सांगितले. आर्टिफिशियल इंटेलिजेंस, डीप लर्निंग, मशीन लर्निंग, जे तुम्ही करत आहात ते तुम्हाला पूर्णतः समजत नसेल, तर ते नीट शिका, अन्यथा तुम्ही नुसतेच डायनासोर व्हाल, असे ते म्हणाले. प्रमुख पाहुणे उद्योजक वैभव नेहेते, केसीआयआयएलचे सागर पाटील यांनी मार्गदर्शन केले. प्रियांका खरारे यांनी आभार मानले. दुपारच्या सत्रात मॅनेजमेंट आणि कॉम्प्युटर दोन्ही विभागांतील ४० संशोधकांनी आपले संशोधन पेपर मांडले.

Prof. Dr. Shilpa Bendale
(President, IMR-IIC)
Director

Prof. Dr. Varsha M. Pathak
Convener, IMR-IIC
Head, Research and Incubation Center
Head, KIEDC, IMR Campus, for KCIIL, KBCNMU

Institute of Management & Research
NAAC Accredited
Jalgaon-2